# गणितावर आधारित स्पर्धांची पर्वणी

**अभिषेक तेली,** रुईया कॉलेज
muntainbox@gmail.com

आयुष्यातील अनेक समस्यांचं गणित सुटता सुटत नाही. पण गणित या विषयातील क्लिष्ट संकल्पना मजेशीर आणि सोप्या पद्धतीनं सोडवण्याचा प्रयत्न पोदार कॉलेजच्या 'मॅथमॅट्रिक्स २०२१' या फेस्टिव्हलमध्ये करण्यात आला. व्हर्च्युअल पद्धतीनं पार पडलेल्या या फेस्टचा 'महाराष्ट्र टाइम्स' मीडिया पार्टनर होता. कॉलेजिअन्सच्या कलागुणांना वाव देण्याचं काम फेस्टिव्हल्सच्या माध्यमातून होत असतं. पण 'मॅथमॅट्रिक्स'ची खासियत




म्हणजे या फेस्टमध्ये दरवर्षी शाळेतील विद्यार्थीसुद्धा सहभाग घेऊ शकतात. गेली अनेक वर्षं हा फेस्ट शाळा आणि कॉलेज या दोन वेगवेगळ्या विभागात पार पडतोय. यंदा देशभरातील ९५०हून अधिक शाळांनी व ११५०हून अधिक कॉलेजांनी सहभाग नोंदवला होता. एकूण मिळून २४००हून अधिक स्पर्धकांनी विविध इव्हेंट्ससाठी आपली नावनोंदणी केली होती.

यंदाच्या 'द बॅटल अगेंस्ट इग्नोरॅमस' या काल्पनिक थीमवर आधारित अनेक रंजक स्पर्धा पार पडल्या. त्यापैकी एक म्हणजे '२००१: अ मॅथ ओडिसी'. यामध्ये स्पर्धकांना गणितातील क्लिष्ट संकल्पना सोडवून अंतिम टप्प्यापर्यंत पोहोचायचं होतं. विशेष निवेदनामुळे हा इव्हेंट बहारदार झाला. त्याचप्रमाणे 'द फास्ट अँड द फॅक्टओरिएल' या इव्हेंटमध्ये स्पर्धकांना गणित विषयाच्या संबंधित प्रश्नांची शक्य होईल तितक्या कमी वेळात उत्तरं द्यायची होती.

यंदा 'मॅथमॅट्रिक्स २०२१'ने सामाजिक भानसुद्धा जपलं. दृष्टीहीन विद्यार्थ्यांसाठी गुगल मीटच्या माध्यमातून एका विशेष वेबिनारचं आयोजन करण्यात आलं होतं. यात गणितातील क्लिष्ट संकल्पना कशा सोडवायच्या याबाबत कुंडलिक बंडगर यांनी मार्गदर्शन केलं. तसंच त्यांनी 'ब्रेल' हे ॲप नेमकं कसं वापरायचं याबाबत माहिती दिली. तसंच 'सिम्फनी ऑफ नंबर्स', 'वॉल ऑफ रिडल्स' आणि 'ट्राइब ऑफ ट्रेडर्स' या स्पर्धासुद्धा पार पडल्या.



## मुख्य निकाल

### शाळा विभाग

**प्रथम पारितोषिक:** चिल्ड्रन्स अकादमी, अशोक नगर
**द्वितीय पारितोषिक:** लोकमान्य टिळक हायस्कूल
**तृतीय पारितोषिक:** कॉन्व्हेंट गर्ल्स हायस्कूल
**बेस्ट टीचर इनचार्ज:** शिजा प्रसाद, लोकमान्य टिळक हायस्कूल

### कॉलेज विभाग

**प्रथम पारितोषिक:**
एन. एम. कॉलेज
**द्वितीय पारितोषिक:**
एच. आर. कॉलेज
**तृतीय पारितोषिक:**
एम. सी. सी. कॉलेज
**बेस्ट सीएल:** शुभम संघवी, एच. आर. कॉलेज